**दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड आयुक्तालय**
**पत्ताः- यमुणानगर, निगडी, पुणे.**
**इमेल आयडी- piantideco.pcpc-mh@gov.in**

## प्रेसनोट दिनांक २०/०७/२०२३

## सराईत गुन्हेगाराकडुन ०२ पिस्टल व ०२ जिवंत काडतुसे दरोडा विरोधी पथकाकडुन जप्त

मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चोबे सो. यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमांची बातमी प्राप्त करुन त्यांचेविरुध्द कडक कार्यवाही करणेबाबत आदेश दिलेले होते. सदर आदेशाप्रमाणे मा.जितेद्र कदम, पोलीस निरीक्षक, दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिं. चिं. यांनी त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांना त्याबाबत सुचना दिलेल्या होत्या.

अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमांची गोपनीय बातमी प्राप्त करीत असताना **पोलीस शिपाई २६४३ गणेश सावंत व पोलीस शिपाई २६७३ सुमित देवकर** यांना बातमी मिळाली की, '' भोसरी स्मशानभुमी समोरील मोकळे मैदान येथे सराईत गुन्हेगार नामे महेश उर्फ अभि विनायक जाधव हा त्याचे कमरेस पिस्टल लावुन येणार आहे. '' अशी बातमी प्राप्त होताच त्यांनी सदरची बातमी ही पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांना सांगितली असता. त्यांनी त्यांचे अधिपत्याखालील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री अंबरिष देशमुख, पोलीस हवालदार ७०२ उमेश पुलगम, पोलीस नाईक १४९१ राजेश कौशल्य, पोलीस नाईक १४५८ आशिष बनकर, पोलीस नाईक १०६२ गणेश हिंगे, पोलीस नाईक १६७४ सागर शेडगे, पोलीस शिपाई २९४७ विनोद वीर पोलीस शिपाई २६४३ गणेश सांवत व पोलीस शिपाई २६७३ सुमित देवकर यांना बातमीची खातरजमा करुन कारवाई करणेबाबत सुचना दिल्या.

नमुद बातमीच्या अनुशंगाने नमुद पोलीस स्टाफने भोसरी स्मशनभुमी परिसरामध्ये सापळा लावुन थांबलेले असताना नमुद इसम हा सदर परिसरात आल्यावर त्यास पोलीस त्याचे मागावर असल्याची चाहुल लागताच त्याने तेथुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला. दरोडा विरोधी पथकाकडील वरील स्टाफने त्याचा पाठलाग करुन त्यास शिताफिने ताब्यात घेतले.

नमुद सराईत गुन्हेगार नामे महेश उर्फ अभि विनायक जाधव, वय - २५ वर्षे, रा प्रतिक हॉटेल मागे, धावडे वस्ती, भोसरी, पुणे याचेकडुन **१.** १,००,००० रुपये किं चे दोन गावठी पिस्टल **२.** १,००० रुपये किं चे एक जिवंत पितळी काडतुसे (राऊंण्ड) हे जप्त करण्यात आलेले आहे. नमुद इसमाविरुध्द भोसरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नं ५९६/२०२३ भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे. गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. नमुद आरोपी याचेविरुध्द भोसरी पोलीस स्टेशन येथे यापुर्वी जबर दुखापतीचा एक गुन्हा नोंद आहे.

सदर कामगिरी मा. श्री. विनयकुमार चौबे सो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. संजय शिंदे सो., सह पोलीस आयुक्त, पिपंरी चिचवड, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा, मा श्री कोपनर सो. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा - १, पिं चि यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक, जितेद्र कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक, अंबरिष देशमुख, पोलीस अंमलदार, उमेश पुलगम, विनोद वीर, गणेश सावंत, सुमित देवकर, आशिष बनकर, गणेश हिंगे, सागर शेडगे व राजेश कौशल्य सर्व नेमणुक दरोडा विरोधी पथक गुन्हे शाखा यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
**पोलीस उप-आयुक्त,**
**गुन्हे शाखा, पिंपरी चिचवड**